**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2021, VOL- 9/67*

# भारतातील स्त्रियांची अवस्था आणि दिशा

**प्रा. छाया शशिपाल शिंदे, Ph. D.**

**मविप्र समाजाचे, के. टी. एच. एम. महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक**

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

**'तदेतत् अर्धद्विदलं भवति'**

स्त्री-पुरुष समान आहेत असं वरील संस्कृत वचनातून सांगितलं असलं, तरी प्राचीन काळापासून आजपर्यंत नेहमीच स्त्री श्रेष्ठ की पुरुष श्रेष्ठ असा वाद सुरूच आहे. आजच्या काही स्त्रियांनी अतिउच्च प्रगती करून देशाच्या विकासातील आपला वाटा उचलला. प्राचीन काळी आध्यात्म मार्गातील धोंड म्हणून स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. तर त्या आधीच्या काळात मैत्रेयी, गार्गी यासारख्या ब्रह्मवेत्त्या स्त्रिया, अनेक ऋषी पत्नींनी समाजाची उत्कृष्ट व्यवस्था लावली. कारण वेद काळातही स्त्रियांना शिक्षण देण्यात येत होते. जेव्हा कोणाला तरी श्रेष्ठ ठरविण्याचा आग्रह होतो तेव्हा दुसरा आपोआपच कमी प्रतीचा किंवा आश्रित होतो. वैदिक विचारधारेने स्त्री-पुरुष दोघांनाही समान ठरविले आहे. म्हणून भारतीय लोक स्त्रीला अर्धांगिनी मानतात. प्रत्येक कार्यात तिला बरोबरीचे स्थान दिले जाते. यज्ञ, लग्न करतांना प्रत्येक ठिकाणी स्त्री पुरुषाच्या बरोबर असते. इंग्रजी भाषेतही स्त्रीला 'बेटर हाफ' (Better half) ठरवून समानतेचा दर्जा दिलेला दिसतो.

परंतु स्त्री-पुरुष मिळून संतती होते. म्हणून उत्कृष्ट समाजधारणेसाठी धर्म, अर्थ, काम, मोक्ष ही चार अंगे मानली गेली. धर्माने समाजाची उत्कृष्ट धारणा व्हावी म्हणून काही नियम केले. पुरुषाने अर्थार्जन करावे आणि स्त्रीने कुटुंब चालवावे असा साधारण प्रघात काही काळ राहिला. परंतु स्त्री ही पुरुषाच्या वासनेमुळे रक्षणीय वस्तू बनली. ती पुरुषाचा विषय बनली. विषय वस्तू भेद म्हणजेच जी वस्तू मला आकर्षक, उपभोग्य व आवश्यक वाटते तिला विषय म्हटले जाते. अशी स्त्री पुरुषाच्या दृष्टीने

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

विषय बनली तर स्त्रीच्या दृष्टीने देखील पुरुषही विषयच बनला. म्हणजेच जोपर्यंत एखाद्या वस्तुत वासना घुसत नाही तोपर्यंत ती वस्तू विषय होत नाही. पण ज्याच्यात वासना घुसली की त्या वस्तूतले सौंदर्य निघून जाते आणि विषयत्व येते. मग आपोआपच उपभोगाच्या दृष्टीने एकमेकांचा वापर केला जातो व त्यातील मानव्य खलास होते. प्रस्तुत शोधनिबंधात 'भारतातील स्त्रियांची अवस्था आणि दिशा' या विषयावर विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे**

१. प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या स्त्री जीवनाचा आढावा घेणे.

२. स्त्री जीवनातील विविध टप्प्यांचा आढावा घेणे.

३. वेगवेगळ्या काळात स्त्रीची प्रगती, अधोगती तपासणे.

४. आजच्या काळातील स्त्री कोण-कोणत्या अवस्थेत आहे तिचा शोध घेणे.

५. जीवनाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक अंगामध्ये आजच्या स्त्रीचे स्थान शोधणे.

६. आज स्त्री सुधारली की पतित झाली याची चिकित्सा करणे.

**गृहितके**

१. प्राचीन काळापासून स्त्री ही सुधारलेली होती.

२. अनेक आक्रमणांनी स्त्रीचे स्थान दुय्यम ठरले आहे.

३. आधुनिक शिक्षणाने स्त्रीचा चेहरामोहरा बदलला.

४. प्रचंड स्पर्धेत स्त्री देखील उतरल्याने तिने काही क्षेत्रात पुरुषापेक्षाही जास्त क्रांती केली.

५. आजच्या जीवन क्षेत्रात स्त्रीचा विविधरंगी दिसणारा चेहरामोहरा लक्षात येतो.

**पद्धती**

सदर निबंध लेखनात सामाजिक समीक्षा अभ्यास पद्धतीचा उपयोग केला आहे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**वैदिक काळ**

भारतीय संस्कृती मोठ्या प्राचीन परंपरेमुळे अखंड राहिली. प्राचीन काळात स्त्रीला निसर्गतःच कुटुंबाचा पाया म्हणून एक नियोजित भूमिका दिली गेली. स्त्रीच्या विनयशील, समर्पित, कोमल, भावूक, भिरु अशा स्वभावामुळे समाजात एक निश्चित भूमिका मिळाली. सांस्कृतिक प्रभावामुळे सामाजिक अपेक्षांमुळे ही भूमिका कायम राहिली. वेगवेगळ्या प्रदेशात परिस्थितीनुरूप तिला कष्टाची कामे देखील करावी लागली. ऋषी-कृषी संस्कृतीत तिला पायाभूत कामे, मुलांचे संगोपन, घराची देखभाल, समाजातील स्त्रीबद्दलच्या अपेक्षा हे सारेच तिच्या वाट्याला आले. पत्नीपदाचा दर्जा कायमच तिला मोठ्या बंधनात ठेवून गेला. एक कर्तव्य परायण पत्नीच चांगली आई होऊ शकते. त्यामुळे तिची ही नियोजित भूमिका तिला कायम कुटुंबात अडकून ठेवण्यास पुरेशी ठरली.

प्राचीन काळ ज्याला आपण वैदिक काळ म्हणतो. म्हणजेच मानवी जीवनात कुटुंब व्यवस्था समाजव्यवस्था स्थापन झाली एक प्रगत समाज अस्तित्वात आला. अशा काळात स्त्रियांचाच समाजाच्या प्रगतीत मोठा वाटा होता. शेती आणि पशुपालन स्त्रियांनीच उत्कृष्टरित्या केल्याची अनेक उदाहरणे देता येतील. म्हणूनच प्राचीन काळात ऋषी-कृषी संस्कृती असेही नाव देता येते. मुळातच स्त्री ही या सृष्टीवरची उत्कृष्ट कलाकृती आहे. निसर्गाचं सर्वात सुंदर रूप आहे. मात्र स्त्रीच्या स्वभावात तितकेच गुणदोष देखील आहेत. म्हणूनच पुरुषाने स्त्रीला सांभाळले, मात्र एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला छळले. प्राचीन काळात शारीरिक कष्टाची कामे देखील स्त्रियांनी पातिव्रत्याच्या नावाखाली मोठ्या हौसेने उचलली. उच्च वर्गातील स्त्रिया वगळल्या तर सामान्य स्तरातील सर्वच स्त्रियांना प्रचंड कष्ट करावे लागले. त्याकाळी स्त्रीजीवनाची उभारणी करताना त्यांना स्त्री म्हणून वैशिष्ट्यपूर्ण शिक्षण दिले. घोषा, लोपामुद्रा या स्त्रिया यज्ञदीक्षा घेऊन दैनंदिन जीवनातील वैदिक विधी करत असत. पुरुषांप्रमाणेच संस्कार देण्यास अधिकारी ठरल्यामुळेच ऋग्वेदातील काही ऋचा त्या स्त्रियांनीच रचल्या आहेत.

ब्रह्मवादिनी या वर्गात मोडणाऱ्या स्त्रियांनी अखंड आयुष्यच ज्ञान उपासनेसाठी अर्पण केले. त्यामुळेच गार्गी, मैत्रेयी, सुलभा, वाचकवनी या स्त्रियांनी तत्त्वज्ञ, शिक्षक, वाद-विवादपटू म्हणून नावे

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

गाजविली. वैदिक काळात स्त्रियांना नियोग पद्धतीचा देखील अधिकार होता. पती असमर्थ असल्यास किंवा अकाली निधन झाल्यास स्त्रीला नियोग पद्धतीचा अवलंब करून वंशसंरक्षण करता येई. कुटुंबात तिचा योग्य सन्मान केला जाई. याचा अर्थ वैदिक काळात स्त्रीला प्रतिष्ठा होती. म्हणूनच स्त्री-पुरुष विषमता त्या काळात दिसत नाही. वंशरक्षणाला महत्व असल्यामुळे तत्कालीन समाजाचा स्त्रीबद्दलचा दृष्टिकोन उदारमतवादी होता. तसेच तिची प्रतिष्ठा सामाजिक संस्कृतीमुळे टिकून राहील. मैत्रेयी, गार्गी या त्या काळच्या उच्चशिक्षित ब्रह्मवेत्त्या स्त्रिया होत्या. त्यांना सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक शिक्षण देण्याचा अधिकार असे. अशा विद्यापारंगत स्त्रियांना 'उपाध्याया' ही पदवी दिली जाई. पत्नी शिवाय पुरुषाला स्वर्गप्राप्ती होऊ शकत नाही असा उल्लेख 'शतपथब्राह्मण' या ग्रंथात आढळतो.

वेदकाळात सभ्यता आणि संस्कृतीच्या दृष्टीने स्त्रियांसाठीच्या प्रगतीचा अतिउच्च काल होता. म्हणूनच त्या काळात उत्कृष्ट समाजधारणेसाठी स्त्रीची विद्वत्ता प्रतिभा परिश्रम वापरले गेले. काही पराक्रमी स्त्रियांनी आपल्या पतीबरोबर युद्धात भाग घेऊन शत्रूला पराभूत केले. अशी अनेक उदाहरणे प्राचीन काळात दिसतात. त्याकाळात स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, शिक्षण, संपत्ती याबाबतीत स्त्री-पुरुष समान होते. म्हणूनच मैत्रेयी, गार्गी, अनुसूया या स्त्रिया शास्त्रार्थ करण्यात पारंगत होत्या. म्हणूनच जिथे स्त्रियांची पूजा केली जाते तेथे देवतांचा वास असतो असे म्हटले जाई.(यत्र नार्यस्तु पुज्यंते,)

एकूणच स्त्री ही घराची सम्राज्ञी हा वैदिक कालखंडातील संस्कृतीचा आदर्श होता. पुढे रामायण काळातही अशा आध्यात्मिक किंवा पराक्रमाच्या क्षेत्रातही स्त्रिया उत्तुंग व्यक्तिमत्व गाठलेल्या आढळतात. अहिल्या, तारा, सीता, मंदोदरी या स्त्रिया देखील तत्कालीन राजांच्याच बरोबरीने काम करीत असत उदा. सीतेने रामाबरोबर वनवास पत्करला, तर रावणाला आपल्या कुळाचं स्मरण करून चारित्र्याचं रक्षण व्हावं यासाठी सल्ला देणारी मंदोदरी किंवा वालीचा वध झाल्यानंतर पुन्हा आपल्या मूळ पतीकडे सुग्रीवाकडे जाणारी तारा, तर अध्यात्म विद्येचे ज्ञान व्हावे म्हणून रामाची वाट पाहणारी शबरी, तसेच व्रतभंग झालेली गौतम ऋषीची पत्नी अहिल्या या सर्वच स्त्रिया असामान्य कोटीतल्या होत्या.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**महाभारत काळ**

महाभारत काळातही गंगा, गांधारी, कुंती, द्रौपदी, शकुंतला अशा अनेक स्त्रियांची चरित्रे पाहिल्यास असे दिसते की, स्त्रियांचा दर्जा वैदिक काळापेक्षा बराच घसरलेला होता.उदा. बहुपतित्वाची चाल द्रौपदीच्या उदाहरणावरून देता येईल. तसेच राजघराण्यातील अनेक स्त्रियांनी राज्ये सांभाळण्यास मदत केली. हजारो विद्यार्थ्यांचे आश्रम चालविणाऱ्या ऋषींना अनेक ऋषी पत्नींनी जो सहयोग दिला तो त्या काळच्या शिक्षण पद्धतीसाठी अतिशय उपयुक्त ठरला. मुळातच शिक्षण पद्धती राजाश्रित नसल्यामुळे राजा सेवक होऊन ऋषी आणि ऋषिपत्नीची मागणी पूर्ण करीत असे जी त्याकाळच्या शिक्षण पद्धतीला अनुकूल होती.

महाभारत काळात ज्या घरात सुसंस्कृत सुशिक्षित स्त्री नसेल ते घर जंगलासारखे मानले जाई. तोपर्यंत स्त्रीला समान अधिकार होते. जेव्हा स्त्रीला समान अधिकार होते, जेव्हा स्त्री समानतेचा अधिकार नाकारला गेला, तिला उपभोग्य वस्तू ठरवले गेले. तेव्हाच संस्कृती रक्षणाच्या नावाने युद्ध झाले. रामायण आणि महाभारत या दोन्हीही ग्रंथांतील मुख्य प्रसंगांवरून दिसून येते.

**उत्तर वैदिक काळ**

उत्तर वैदिक कालखंडात मात्र स्त्रीचा दर्जा अधिकच घसरत गेला. स्त्रियांना पितृप्रधान समाजव्यवस्था आल्यामुळे चूल आणि मूल एवढीच भूमिका राहिली. शिक्षणाचा अधिकार गेला. विवाहाचे वय कमी झाले आणि शुद्रासारखेच तिलाही बंधनांच्या मर्यादेत घातले गेले. मनूने एका बाजूला स्त्रियांना देवता मानले तर दुसऱ्या बाजूला तिला दिलेल्या स्वातंत्र्याचे स्वैराचारात रूपांतर होऊ नये म्हणून कडक बंधने लादली. पुढे येणाऱ्या स्मृतींमधूनही स्त्रियांच्या बद्दलचे निर्णय पुरुषांनी आपल्या आधिकारात घेतले. मनूने स्त्रियांच्या रक्षणासाठी काही नियम केले. विधवा, पतिव्रता, आजारी अशा स्त्रियांचे रक्षण समाजानेच करावे. तसेच स्त्रीकडून काही चुकले तर तिला दोष देऊ नये. स्त्री प्रतिकूल झाली तर नरकापेक्षाही भयंकर असते आणि म्हणून तिला सतत अनुकूल ठेवले पाहिजे तरच

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

ते घर चांगले राहील. स्त्रियांचा आदर केला नाही तर तो मानवजातीला शाप ठरेल. म्हणून स्त्रियांच्या डोळ्यातून अश्रू येऊ देण्याची वेळ जे आणतात ते दैवतांच्या क्रोधाला बळी पडून भस्म होतात. मनूने त्यासाठी स्त्रीला गृहलक्ष्मी मानले आहे. माता म्हणून स्त्रीचे स्थान सर्वोच्च आहे. म्हणूनच 'मातृदेवो भव' हे पहिले वचन आहे. स्त्रीला संपत्तीची आधिकारीणी ठरविणे गरजेचे असल्याचे मनूने म्हटले आहे, मग ती स्त्री विवाहित असो की अविवाहित. याचाच अर्थ स्मृतीकाळात स्त्रियांचे हक्क अबाधित ठेवले गेले. त्यांच्या दाग-दागिन्यांवर, स्त्रीधनावर मुलीचा हक्क राहील असा नियम केला गेला. स्मृतींमध्ये स्त्रियांबद्दल अनेक कठोर नियम होते. तरीही स्त्रियांनी आपल्या त्यागाच्या, परिश्रमाच्या, अभ्यासाच्या बळावर समाजात आदर्श निर्माण केले.

पुढे स्त्री अधिकच रक्षणेय बनली. तिला तिच्या कर्तृत्वाला सिमित केले गेले. लहानपणी पित्याने सांभाळावी, तारुण्यात पतीने सांभाळावी, म्हातारपणी मुलांनी सांभाळावी असे म्हणून स्त्रीचे स्वातंत्र्य नष्ट केले गेले. ती आपल्याच घरात कैदी बनली तिचा शिक्षणाचा अधिकार गेला. पुढे धार्मिक कार्यातही तिला डावलले गेले. अध्यात्म मार्गातील धोंड म्हणून बाजूला केले गेले. नंतर बहुपत्नीत्वाची चाल आली आणि स्त्रीचा सामाजिक स्तर घसरत गेला. तिची स्थिती अधिकच खडतर बनली. पुढे-पुढे अतिशय लहान वयात तिला विवाह बंधनात घालून कौटुंबिक जबाबदारीत डांबले गेले. तिचे सर्व अधिकार पुरुष वर्गाने हिसकावून घेतले. विधवा झाली तर दुसरे लग्न करण्याचा अधिकार नाकारला गेला.

**बौद्ध काळ**

बौद्ध काळात स्त्रियांना पुरुषांसारख्याच भिक्षुनी होण्याचा दर्जा देण्याचा प्रयत्न झाला. त्यांनीही निर्वाणपद प्राप्त करावे. असा विचार महात्मा गौतम बुद्धांनी देऊन शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात मानाचे स्थान दिले. बौद्ध काळातही अनेक स्त्रियांनी सुंदर भक्तीगीते रचलेत. 'पटाचारा' नावाच्या स्त्रीने आपल्या मधुर वाणीने पाचशे स्त्रियांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. त्यामुळेच बौद्ध धर्माच्या काळात स्त्रिया पुन्हा मानाच्या स्थानापर्यंत पोहोचल्या.

**मध्ययुगीन काळ**

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मध्ययुगात मुघल साम्राज्यात स्त्रियांची स्थिती अधिकच दयनीय झाली. तिला शुद्ध ठेवण्यासाठी तिच्या मातृत्वाचे रक्षण करण्यासाठी वंशवृद्धीसाठी आणखी कठोर नियमात बांधले गेले आणि तिच्यासाठी शिक्षणाची दारे बंद झाली. वडिलांच्या घरी जी ऋतुस्नात होईल तिच्या वडिलांच्या बेचाळीस पिढ्या नरकात जातील असा विचार त्याकाळच्या धर्मरक्षक पुरुष वर्गाने मांडला. आपोआपच तिच्या विवाहाचे वय जेमतेम आठ नऊ वर्षापर्यंत पोहोचले आणि विधवा विवाह नसल्यामुळे कोणी रक्षण कर्ते नसल्यामुळे स्त्रिया सती जाऊ लागल्या.

इ.स. १२०० पासून १८०० पर्यंतचा कालखंड हे मध्ययुग मानले जाते. या काळातही जे धर्मप्रसारक, भक्त सांप्रदायिक, महात्मे होते, त्यांनीच बंधनात पडलेल्या स्त्रियांच्या मुक्तीसाठी प्रयत्न केले. महाभारत काळानंतर स्त्रियांना अंधार युगाचाच सामना करावा लागला. मनूच्या कालखंडातच स्त्री ही रक्षणीय वस्तू बनल्यामुळे अनेक नियमांनी बांधली गेली. इ.स. ५०० नंतर स्त्रीच्या स्थानाची घसरगुंडी झाली. बाराशे नंतर मुस्लिम राज्यकर्ते भारतात आले आणि अनेक जाचक रूढी अस्तित्वात आल्या. इ.स. ९०० च्या दरम्यान रूढ झालेली सतीप्रथा पुढे चालू राहिली. तसेच सामाजिक व्यवस्थेत वेश्या म्हणून एक नवीन सामाजिक अविभाज्य अंग विकसित झाले. त्यामुळे स्त्रीचा दर्जा आणखीच खालावला. याचे उत्तम उदाहरण कान्होपात्रेच्या रूपाने देता येईल. सर्वच स्त्रियांना कौटुंबिक व सामाजिक बंधनांनी जखडल्यामुळे त्या पुरुषी वर्चस्वाखाली भरडल्या गेल्या. चौदा माणसांच्या कुटुंबात आश्रित म्हणून आलेली जनाबाई जेव्हा 'डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी' असे म्हणते तेव्हा याचा अर्थ आधी तिला कसलेच स्वातंत्र्य नव्हते. परंतु वारकरी पंथ अस्तित्वात आल्यानंतर उच्चवर्णीयां बरोबर स्त्री शूद्रांना देखील अधिकार आहे. हे संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत सावता माळी यांनी कृतीतून सिद्ध केले. हाच प्रयत्न याआधी महानुभाव पंथाचे संस्थापक महात्मा श्री चक्रधर स्वामी यांनीही केला आणि महदंबेला भक्तिमार्गात उच्च पद मिळवण्यास सहाय्य केले.

Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

एकूणच स्त्रियांनीच पुरुषांना सर्वच क्षेत्रात सांभाळण्याचे काम केले. मात्र मुस्लिमांनी स्त्रियांच्यावर अनेक अत्याचार केले त्यामुळे कान्होपात्रेसारख्या स्त्रीला मरावे लागले. धार्मिक चळवळीच्या अंगाने स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविण्याचे प्रयत्न संतांनी केले. तरीही पतीलाच परमेश्वर मानून पती सेवा हाच स्त्रीच्या भक्तीचा मार्ग आहे. स्वयंपाक घर हेच स्त्रीचे विद्यालय आहे. अशा समजुतीमुळे स्त्रीचे बंधन अधिकच घट्ट झाले. त्यामुळे तिचा दर्जा कनिष्ठ ठरला. महात्मा बसवेश्वरांनी सुद्धा स्त्रियांना त्यांचे हक्क आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, अन्यायापासून त्यांची सुटका झाली पाहिजे यासाठी प्रयत्न केले. आध्यात्मिक उपासनेद्वारा त्यांच्या जीवनात स्थिरता आणण्याचा प्रयत्न केला. असे बसवेश्वरांच्या काळातील अक्कमहादेवी, राणी महादेवी लखख्मा आदी महान योगिनी स्त्रियांच्या आध्यात्मिक कार्यावरून दिसून येते. म्हणजेच महात्मा बसवेश्वरांनी त्यांच्या काळात वीर शैव संप्रदायातून स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोण उन्नत केला. स्त्रियांना सर्वच क्षेत्रात अधिकार प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न केले. महात्मा बसवेश्वरांच्या पत्नी शरणी गंगाम्बिवा यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रियांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी अनेक छोटे उद्योग केंद्रे व शैक्षणिक संस्कार केंद्रे सुरु केली. एकूणच धार्मिक क्षेत्रात स्त्री-पुरुष हा भेद कमी करण्यासाठीचे काम केले. अक्कनागम्मा, गंगम्मा, नागालंबीका, गंगाम्बिका आदी स्त्रियांनी महिला मंडळे स्थापन केली व लिंगायत तत्वज्ञान सांगून मुल्य संस्कृती जोपासली. विधवांचे पुनर्विवाह लावून दिले. वेश्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली. स्त्री आणि केशवपन या दृष्ट प्रथा नाहीशा केल्या. गरीब स्त्रियांचे चरितार्थ सुधारावे म्हणून अनेक उद्योग सुरू केले.

एकूणच वीरशैव संप्रदायाने स्त्रियांना विकासाच्या वाटा मोकळ्या केल्या. हेच काम वारकरी संप्रदायाने देखील मोठ्या प्रमाणात स्त्री-शूद्रांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम हिरिरीने केले. त्यामुळे भक्ती संप्रदायात संत मुक्ताबाई, संत जनाबाई, कान्होपात्रा या तत्ववेत्या स्त्रियांनी समाजात स्त्री आणि शूद्र या वर्गाचे स्थान बळकट करण्याचा प्रयत्न केला. वारकऱ्यांनी कोणताही भेद न मानता सर्व स्त्री-पुरुष आध्यात्म क्षेत्रात सारखेच आहेत असे म्हणून जात, कुळ, वंश, लिंग, भेद या तटबंदया नष्ट केल्या. वारीच्या रूपाने मोठ्या प्रमाणात जागरण केले. संत तुकाराम महाराज यांनी तर परस्त्रीला पांडुरंगाच्या

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

रखुमाई समान मानले. सोळाव्या, सतराव्या शतकात मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली आई जिजाबाई यांच्या शिकवणुकीतून स्त्रीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. छत्रपती शिवाजी महाराजांनी तर कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला आपल्या आईपेक्षाही वरचा दर्जा देऊन सन्मानित केले. विठ्ठल भक्तीच्या संस्कारामुळे महाराष्ट्रात मोजक्याच स्त्रियांनी संपूर्ण स्त्री वर्गाची प्रतिष्ठा वाढवली. हा सर्वोच्च बहुमान राजमाता जिजाऊंकडे जातो. तुकाराम महाराजांची शिष्या संत बहिणाबाई हिने अतोनात छळ सोसून देखील पुरुषांना लाजवेल असे स्वतःच स्वतःला घडविण्याचे काम केले, असे तिच्या अभंगांतून दिसते.

भारतात प्राचीन काळापासून अनेक धार्मिक आणि राजकीय क्रांत्या झाल्या. हिंदू-बौद्ध, शैव-वैष्णव, हिंदू-मुस्लीम यांच्यातील झगडे यांनी अनेक बदल घडवून आणले. तसेच राजपूत, सुलतानशाही, मुघलशाही, आदिलशाही, शिवशाही, पेशवेशाही अशा अनेक राजकीय क्रांत्या झाल्या. हिंदू सरदारांची जागा नबाबांनी घेतली. चातुर्वर्ण्याच्या चौकटीत असलेला भारतीय समाज स्त्रियांना आणखी निर्बंध लादत राहिला. त्यामुळेच पुरुषांपेक्षाही स्त्रियांच्यावर सतत बंधनांची टांगती तलवार कायम राहिली. पेशवाईच्या काळात देखील दुसऱ्या बाजीरावाने तमाशासारख्या कलेला उत्तेजन देऊन आधीच वेश्यांची संख्या जास्त असलेल्या पुण्यात चंगळवाद बोकाळला. गावोगाव तमाशाच्या फडात बायका नाचू लागल्या. त्यामुळे तिची उपभोग्यता समाजाकडून वाढली. स्त्रीबद्दलचा भोगवादी दृष्टिकोण वाढल्यामुळे तिला सामाजिक अधःपतनाच्या खाईत लोटण्याचे काम दुसऱ्या बाजीरावाच्या कालखंडात झाले.

**आधुनिक काळ**

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

या कालखंडाला १८१८ पासून गृहीत धरले तरी इंग्रजांच्या प्रभावामुळे ख्रिस्ती धर्माच्या प्रसारामुळे भारतीय संस्कृतीत अनेक प्रकारचे बदल झाले. लोकहितवादी, गोपाळ हरी देशमुख, राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे या थोर समाजसुधारकांनी अव्वल इंग्रजी काळात आपल्या संस्कृतीतील वाईट चाली-रिती मोडीत काढल्या. महिलांची स्थिती सुधारण्यासाठी व त्यांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळण्यासाठी शिक्षणाचे द्वार खुले केले. सतीप्रथा, बालविवाह, पुनर्विवाह, अस्पृश्यता अशा अनेक दृष्ट रूढी बंद करण्यासाठी तसेच स्त्रियांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी कायदे करण्याचा इंग्रज सरकारकडे आग्रह धरला. यातील बरेच कायदे ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मदतीने अमलात आणले. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत या समाजसुधारकांनी स्त्रियांच्या सुधारणेसाठी प्रचंड प्रयत्न केले. स्त्रियांना स्वातंत्र्याचा व शिक्षणाचा हक्क नाकारणाऱ्या लोकांच्या विरोधात जाऊन समाजातील अनेक अनिष्ट रूढी बंद केल्या. स्त्रीला विविध कार्यक्षमतेची दालने खुली केली. समाज जर सुसंस्कृत करायचा असेल, समाजाची सेवा घडायची असेल तर स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे असा विचार पुढे आला.

इ. स. १८८० ते १९३० या काळात भारतात महिला आंदोलनांना सुरुवात झाली. राष्ट्रीय विकासात महिलांना स्थान मिळाले, म्हणूनच भारत छोडो, सविनय कायदेभंग, स्वदेशी अभियान, असहकार आंदोलन अशा अनेक चळवळीत महिला अग्रेसर राहिल्या. स्त्रिया शिकल्या नाही तर समाजाची उन्नती होणार नाही असा विचार समाज सुधारकांनी केला. महिलांना समान अधिकार मिळवून देणे आणि महिलांचा दर्जा उंचावणे यासाठीच ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य महिला समाज, राष्ट्रीय सामाजिक परिषद अशा अनेक संस्था उदयाला आल्या. ज्यातून सामाजिक स्तरावर महिलांचे स्थान उंचावण्यासाठी समाज सुधारक पुरुषांबरोबरच डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी, डॉ. ॲनी बेझंट, लेडीटाटा, लेडी अंबरडीन, सरलादेवी चौधरी, मागरिट काझीन अशा अनेक कर्त्या सुधारक महिलांनी महिला विकासासाठी मोठे काम केले. इ.स. १९१७ मध्ये मॉंटेग्यू या इंग्रज अधिकाऱ्याकडे महिलांच्या मताधिकाराची मागणी केली. दुसऱ्या वर्षी सरोजिनी नायडू यांनीही मताधिकाराचा प्रस्ताव ठेवला.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

एकूणच या आंदोलनामुळे इ.स. १९३७ सालच्या निवडणुकीत ४१ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात समान अधिकार प्राप्त करण्यासाठी महिलांची वाटचाल सुरू झाली. त्यासाठी स्वातंत्र्यानंतरही महिलांना अनेक प्रकारचे वर्गीकरण करून त्या-त्या स्तरातल्या महिलांचे संघटन करावे लागले. उदा. उच्चशिक्षित स्त्रिया, व्यावसायिक स्त्रिया, श्रमजीवी महिला, शोषित महिला, मंदबुद्धी महिला अशा अनेक प्रकारच्या महिलांचे संघटन करून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न झाले. पुढे हुंडाबंदी, दारूबंदी अशा अनेक चळवळी महिलांच्या हक्क रक्षणासाठी कार्यान्वित झाल्या. त्यासाठी महिलांनीच मोठे काम केले. राजमाता जिजाऊंचा वारसा जतन करणाऱ्या अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, कस्तुरबा गांधी, मदर तेरेसा अशा अनेक स्त्रियांनी स्त्रियांच्या हक्कासाठी शिक्षणासाठी व देश सेवेसाठी आपले आयुष्य पणाला लावले.

**स्वातंत्र्योत्तर काळ**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सामाजिक क्षेत्रात काम करण्यास स्त्रिया कार्यक्षम आहेत हे सिद्ध झाले. कारण स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पुरुषांबरोबरीनेच पुरुषार्थ गाजवला व स्त्रीला एक नवा दर्जा प्राप्त करून दिला. त्यामुळेच स्त्रियांनी राजकारणातील प्रवेश, परदेशी मालावर बहिष्कार, असहकार आंदोलन यात मोठा सहभाग घेतला. वेळप्रसंगी तुरुंगवासही पत्करला. त्यामुळेच अनेक सामाजिक कुप्रथा कमी करण्यासाठी स्त्रिया पुढे आल्या. आधुनिक काळात मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रिया विविध क्षेत्रात काम करू लागल्या. राजकारणासारख्या क्षेत्रात त्या कार्यक्षम झाल्यामुळेच त्यांचा समाजातील दर्जा सुधारला. आर्थिक स्वातंत्र्याच्या बाबतीतही त्यांना बऱ्यापैकी स्थिरता प्राप्त झाली. पुढे द्विभार्या प्रतिबंधक (१९५५), वारसा हक्क कायदा (१९५६) या कायदयांमुळे तसेच कायदेशीर विभक्तपणा आणि घटस्फोट या गोष्टींबरोबरच सर्वधर्मीय स्त्रियांना १९७२ साली कायदयानुसार विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करण्याचा हक्क प्राप्त झाला. हुंडाबंदी तसेच वेश्याव्यवसाय विरोधी कायदा, बलात्कार विरोधी कायदा, गर्भजल परीक्षा विरोध कायदा असे अनेक कायदे झाल्यामुळे व स्त्री शिक्षणाची मोठ्या

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

प्रमाणात सोय झाल्यामुळे आजच्या काळात महिला उच्चशिक्षित होऊन मोठमोठ्या पदांवर नोकऱ्या करू लागल्या. कला, नाटक, चित्रपट, जाहिरात, सौंदर्य, क्रीडा, गिर्यारोहन, अवकाशभ्रमण, सैन्यदल, राजकीय, वैमानिक आदी अनेक क्षेत्रात तडफदार महिला सक्षमपणे कोणतीही जबाबदारी पार पाडण्यास सिद्ध झाल्या.

१९६१ साली हुंडा देणे किंवा घेणे अपराध मानले गेले. हळूहळू स्त्रीची दशा बदलू लागली. त्यातच भारतीय संविधानाने स्त्रीला आपले हक्क प्राप्त करून दिले. धार्मिक, सामाजिक बंधनातून सोडविले, बहुपत्नीत्वाची चाल बंद झाली. त्यामुळे स्त्रीची स्थिती बदलू लागली. आधुनिक काळात पंतप्रधान, राष्ट्रपती अशा सर्वोच्च स्थानावर स्त्री विराजमान झाली. आपोआपच स्त्रियांची बाजू पुरुषांकडून भक्कम करण्याचे प्रयत्न सुरू झाले. वडील, भाऊ, पती, मुलगा यांनीही तिच्या विकासात मोलाचा वाटा उचलला आणि संविधानातील कायद्यांमुळे मिळालेल्या अधिकारांनी तिला आपली मान ताठ करता आली. तरीही पारंपरिक संस्कारामुळे स्त्रीच पुरुष प्रधानतेला मोठ्या प्रमाणावर बळी पडत होती. आजही मोठ्या प्रमाणावर स्त्रिया बळी पडतात, मारून टाकल्या जातात, आत्महत्या करतात, त्यांना नष्ट केले जाते. मग माझ्या मनात असा प्रश्न येतो की, भारतात स्वातंत्र्य मिळाले ते केवळ पुरुषांनाच मिळाले का? आजही एका बाजूने शिक्षित स्त्रियांनी उंच भरारी घेतली आहे. जागतिक पातळीवर होणाऱ्या अनेक क्रीडा प्रकारात सुवर्ण पदकांच्या मानकरी, वैमानिक, मेट्रोचालक, अंतराळ विरांगणा, सैन्यात कमांडो, शिक्षण क्षेत्रात, जीवनाच्या सर्व क्षेत्रात संधी मिळेल तिथे आधिकारीणी म्हणून मोठ मोठ्या हुद्द्यावर स्त्रियांना पाहतो.

आज मितिला नागरी क्षेत्रात अनेक स्त्रिया आधिकारिणी बनून पुढे आल्या. शिक्षिका ते कलेक्टर पर्यंतच्या सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी मानाच्या जागा आपल्या कुशलतेच्या बळावर पटकावल्या. आधिकारिणी बनून देशाच्या प्रगतीला एक नवा आयाम दिला. आय. ए. एस., आय.पी. एस. या पदांवर जाऊन नागरी सेवा करणाऱ्या आज कितीतरी स्त्रिया आपले कौशल्य व विद्वत्ता देशसेवेसाठी अर्पण

करीत आहेत. उदाहरणार्थ नीला सत्यनारायण, लीना मेहेंदळे, चंद्रा अय्यंगार, मीरा बोरवणकर, डॉ अश्विनी जोशी, राधिका रस्तोगी, उज्वला भागवत, नीलांबरी जगदाळे, शितल उगले, दीप्ती मेहेंदळे, मोक्षदा पाटील, पियुष जगताप, संपदा मेहता अशी शेकडोंनी नावे सांगता येतील. इतक्या महिला वरिष्ठ अधिकारी बनून सेवा देत आहेत.

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातही काम करणाऱ्या स्त्रियांची वानवा नाही. सिंधुताई सपकाळ, गोदावरी परुळेकर, साधना आमटे, मंदा आमटे, अनुताई वाघ, मेधा पाटकर, अपर्णा रामतीर्थकर, सुप्रिया सुळे, मविप्रच्या सरचिटणीस नीलिमा ताई पवार असा हा समाजसेवेचा वसा बोटावर मोजण्या इतका राहिला नसून आता प्रत्येक गावोगावी महिला मंडळे स्थापन झाली आहेत. बचत गटाच्या रुपाने समाजाची आर्थिक घडी बदलण्याचे काम करणाऱ्या तसेच राजकारणात अनेक गावांचे सरपंच पद भूषविणाऱ्या बालवाडी अंगणवाडी कार्यकर्त्या, शिक्षिका, प्राध्यापिका यांची संख्या देशपातळीवर लाखोंच्या घरात जाईल. म्हणूनच समाजसुधारणेच्या कार्यात निबंधाच्या शीर्षकाप्रमाणे 'तदेतत् अर्धद्विदलं भवति' या न्यायाने स्त्रियांचा प्रत्येक क्षेत्रातील मोठा सहभाग नाकारता येणार नाही किंवा त्यांचे कर्तृत्व नजरेआड करता येणार नाही.

वरील सर्व विकास जरी खरा असला तरीही समाजाची दुसरी बाजू मात्र आजही अंधारातच आहे. एखाद्या पांढऱ्या पुष्ट भागावर मोठा काळा डाग असावा, त्याप्रमाणे ही बाजू देखील ठळक दिसते. जिच्यासाठी अजून कितीतरी स्त्री कार्यकर्त्यांची उणीव भासत आहे. उदा. चंगळवादाच्या नावाखाली कोलमडून पडलेली कुटुंब व्यवस्था, भ्रष्टाचारामुळे पोखरलेला समाज, अत्यल्प वेतनावर काम करणाऱ्या लाखो स्त्रिया, दारिद्र्यामुळे लाचारी पत्करून अन्याय सहन करणाऱ्या हजारो स्त्रिया रोजच घुसमटत आहे त्यांचे बळी जात आहे. न्यायाच्या प्रतीक्षेत अनेकदा सबळ पुराव्याअभावी कितीतरी स्त्रिया संपून जात आहे. अनेक आपत्तींनी पुरुषांच्या आत्महत्यांनी उघड्या पडलेल्या कुटुंबांना सावरणाऱ्या आणि दुर्दैवाच्या खाईत रोजच संघर्ष करणाऱ्या धनदांडग्या स्त्री पुरुषांच्या अत्याचाराला अन्यायाला बळी पडणाऱ्या ज्ञात अज्ञात कितीतरी स्त्रिया आपण रोजच प्रसारमाध्यमांवरून पाहतो.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

एका बाजूला स्त्रियांनी प्रगतीच्या उंच शिखरावर भरारी मारलेली दिसते तर कधीकधी यात विरोधाभासही दिसून येतो. पुरुष असलेले वकील, शिक्षक, डॉक्टर, पोलीस अधिकारी आपल्या घरातील स्त्रियांना छळतांना दिसतात. आजही अनेक स्त्रियांच्या छळाच्या कहाण्या अंगावर काटा आणतात. स्त्रियांसाठी कितीतरी कायदे झाले, नियम झाले, तरीही बलात्काराच्या कहाण्यांची, छळांच्या कहाण्यांची, आत्महत्येच्या घटनांची जंत्री संपत नाही. उपभोग्य वस्तू म्हणून तिच्या देखणेपणाचा, आकर्षकतेचा फायदा जाहिरातींसाठी केला जातो. दारिद्र्यामुळे तिला शरीरविक्रय करावा लागतो. अशा स्त्रिया भारतात मोठ मोठ्या शहरात लाखोंच्या संख्येने आढळतात. आजच्या इंटरनेटच्या काळात स्त्रियादेखील काही प्रमाणात पुरुषांचा छळ करू लागल्या आहेत. त्यामुळे अधःपतित, कामुक, स्त्री-लंपट पुरुष अशा हुशार स्त्रियांच्या जाळ्यात अडकून स्वतःची फरपट करून घेताना दिसतात. ज्यातून भल्या भल्यांची भंबेरी उडते.

तसेच अंधश्रद्धा हा एक प्रचंड मोठा रोग. अज्ञानी, दरिद्री समाजाच्या पाचवीला पुजलेला आहे. त्यातही स्त्रियांचे आणि मुलींचे अधिक बळी जातात. ही संख्या अशिक्षित समाजात मोठ्या प्रमाणावर आहे, तर काही अस्मानी संकटांना व काही सुलतानी संकटांना बळी पडणाऱ्या स्त्रिया वाचवायच्या असतील तर त्यांना मुलभूत शिक्षण, योग्य रोजगार आणि पुरेसे संरक्षण देण्यासाठीही आता शिकलेल्या सक्षम स्त्रियांनीच पुढे यायला हवे. ह्या कार्यासाठी समाजातल्या चांगल्या पुरुषांचे सहकार्य, आधार, पाठिंबा मिळेल. तरीही खेडोपाडी आणि शहरातल्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणारा दारिद्र्याने पिचलेला समाज, त्यांची अर्धी बाजू म्हणजे स्त्री सक्षम करायची असेल तर आजही कितीतरी नवे कायदे नव्या संघटना उभ्या करून त्या कृतीत आणाव्या लागतील आणि स्त्रियांच्या तुलनेत समस्या जाणून घेऊन त्यासाठी पुरुषांनाही सुधारणेसाठी स्त्रियांच्या चांगल्या बाजू सक्षम करण्यासाठी समर्थपणे उभे राहावे लागेल. अन्यथा आपल्या समाजाची एखाद्या हत्तीरोग झालेल्या माणसासारखी अवस्था होईल. हत्ती रोग झालेला माणसाचा एकच पाय खूपच जाड झालेला असतो. आपण 'तुमची तब्येत

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

फारच सुधारली हो' असे विचारल्यासारखे होईल. तसे काहीसे स्त्रियांच्या सुधारणे बाबतीत घडू नये असे मला वाटते. सुधारलेल्या उच्च स्थानावर असलेल्या सर्वच क्षेत्रातील स्त्रियांनी आता सावित्रीबाईंसारखीच कंबर कसली पाहिजे. सर्व स्त्री जातीच्या प्रगतीसाठी सर्वशक्तीनिशी ठामपणे उभे राहिले पाहिजे. तरच या पुरुष प्रधान संस्कृती असलेल्या या देशात स्त्रियांना काही अंशी न्याय मिळू शकतो. तसा तो सर्वच स्त्रियांना मिळावा त्यासाठी स्त्री-पुरुष दोघांनीही समान पातळीवर प्रयत्न करावा ही माफक अपेक्षा ठेवून निबंधाला पूर्णविराम देते.

**निष्कर्ष :**

१. प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या स्त्रियांची वाटचाल पाहता स्त्रियांच्या वाट्याला अनेक स्थित्यंतरे आलीत.

२. अशा स्थित्यंतरामध्ये बऱ्याच ठिकाणी पुरुषाचेच वर्चस्व दिसून येते.

३. इंग्रज काळातील शिक्षणाच्या समानतेमुळे शिक्षणाची संधी मिळाली, म्हणून स्त्रियांना अंगभूत सामाजिक, राजकीय, शैक्षणिक
गुणांचा विकासासाठी उपयोग झाला.

४. आजच्या काळात जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अल्पसंख्येने का होईना मात्र स्त्रीने आघाडी घेतली आहे. थोड्याच काळात पुन्हा
स्त्रीसत्ताक व्यवस्था येईल असे वाटते.

५. त्यासाठी स्त्रियांना मोठ्या प्रमाणात शिक्षणाची सुविधा व नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी महत्वाच्या जागा उपलब्ध करून
देणे गरजेचे आहे.

**समारोपः**

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

एकूणच काय तर निसर्गाने निर्माण केलेल्या स्त्री-पुरुष या एकाच नाण्याच्या दोन बाजू एकमेकांवर कुरघोडी करताना दिसतात. मात्र स्त्री संख्येने मोठ्या प्रमाणात सांभाळणारी असल्याने तिचे जास्त हाल होतात. आधुनिक शिक्षण पद्धतीत जे शिक्षण पुरुषाला दिले जाते तेच शिक्षण स्त्रीलाही दिले गेले. त्यामुळे तिच्यातील नैसर्गिक बुद्धी, क्षमता, चपळता आपोआपच जागृत झाली. आत्मविश्वासाने तिने जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आपला वेगळा ठसा निर्माण केला. तरीसुद्धा स्त्रियांच्या संख्येच्या तुलनेत उच्च स्थानावर असलेल्या स्त्रियांची संख्या अजूनही नगण्यच आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी आपले स्थान आरक्षित करण्यासाठी तिला कायद्याचा आधार घ्यावा लागतो. स्त्री-पुरुष या नैसर्गिक भेदातून बऱ्याचदा तिलाच छळाला सामोरे जावे लागते. तरीही भविष्यात मात्र तिच्या उन्नतीसाठीची अनेक क्षेत्रे आशादायक, दिलासादायक आहेत असे दिसते.

**संदर्भ :**

**१. प्रा. कवी माधवी, महिला कल्याण आणि विकास: विद्या प्रकाशन नागपूर, प्र.आ. ऑक्टो. १९९९**

**२. सौ. जरग स्वप्ना, अधिकारिणी: सिनर्जी पब्लिकेशन, पुणे, चौथी आ. मार्च २०१४**

**३. डॉ. जगदाळे कुन्ता, नारी समस्या: विनंद ऑफसेट प्रिंटरर्स, सोलापूर, प्र.आ. जानेवारी १९९५**

**४. लिमये चंपा, अबला होई प्रबला: श्रीविद्या प्रकाशन, पुणे प्र.आ. सप्टें. १९८८**

**५. बॅ. मेढेकर मराठे अर्चना, महिलांचे कायदे: साकेत प्रकाशन प्र. आ. जानेवारी २०१६**

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*